# मिरा भाईंदर महानगरपालिका

नगररचना विभाग
स्वामी विवेकानंद भवन, आर.बी.के. स्कूलच्या बाजूला, कनाकिया, मिरारोड (पू.)

जा.क्र. मनपा/नर/ ४४००/२०१८-१९ दिनांक:- २०/३/२०१९

## // भोगवटा दाखला //

प्रति,

1) मे. डी.एन. पटेल ॲन्ड असो. (सल्लागार अभियंता)
101, अशोका शॉपींग सेंटर, नवघर रोड, भाईंदर (पू.)

2) विकासक श्री. चंदुलाल पी. पटेल, मे. जी.सी.सी. हॉटेल्सचे भागीदार श्री विजय टेविराज सैनी, मे. स्वागत प्रॉपर्टी डेव्हलपर्सचे भागीदार श्री. आर सी जनानी (विकासक)
148/150, शहा एन. नाहर इंडस्ट्रीयल इस्टेट
एस.जे. मार्ग, लोअर परेल (प.), मुंबई 400 013

विषय - मौजे घोडबंदर, स.क्र. 77 हि.क्र.1,2,3पै., या जागेतील इमारत प्रकार टाईप पी-2, विंग "ए" (स्टिल्ट + 14) व विंग "बी" (स्टिल्ट + 10) करिता (सल्लागार अभियंता प्रस्तावित इमारत "स्वागत हाईट्स") भोगवटा दाखला मिळणेबाबत.

संदर्भ - 1) मे. डी.एन. पटेल ॲन्ड असो. (सल्लागार अभियंता) यांचा दि.15/01/2019 रोजीचा अर्ज.

2) मे. सक्षम अधिकारी नागरी संकुलन ठाणे यांचेकडील युएलसी/टिए/डब्ल्यू.एस.एच.एस-20/एस.आर.-740 दि.31/10/1994 ची मंजूरी व युएलसी/टिए/एटीपी/डब्ल्यू.एस.एच.एस-20/एस.आर.-740 दि.3/08/1998 अन्वये शुद्धीपत्रक व जा.क्र.युएलसी/टिए/एटीपी/कलम-20/भोगवटा दाखला/एसआर-740 दि.15/09/2008 अन्वये भोगवटा दाखला मिळणेकामी नाहरकत दाखला.

3) मा. जिल्हाधिकारी, ठाणे कार्यालयाचे पत्र क्र. महसुल/क-1/टे-8/एनएपी/एसआर-357/94 दि.02/08/1995 अन्वयेचे आदेश.

4) मिरा भाईंदर महानगरपालिकेकडील जा.क्र. मनपा/नर/3094/2015-16 दि.03/11/2015 अन्वये सुधारीत बांधकाम परवानगी.

5) मे. डी.एन. पटेल ॲन्ड असो. (सल्लागार अभियंता) यांनी (Building Completion Certificate) दि.09/01/2019 रोजीचा इमारत पुर्णत्वाचा दाखला.

6) मे. अनिष ॲन्ड असो., यांचेकडील इमारतीचे बांधकाम तांत्रिकदृष्टया योग्य असलेबाबतचा दि.02/01/2019 रोजीचा दाखला.

7) मे. विनय सॅनिटेशन यांचा दि.17/12/2018 रोजीचा प्लबींगबाबतचा दाखला.

8) मिरा भाईंदर महानगरपालिकेचे सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी पत्र क्र. मनपा/सांबा/4112/2018-19 दि.14/08/2018 अन्वये सोलार वॉटर हिटींग सिस्टीमचा नाहरकत दाखला.

9) महानगरपालिकेचे रेन वॉटर हार्वेस्टींग प्रकल्पाची उभारणी केलेबाबतचे पाणीपुरवठा विभागाकडील पत्र क्र. मनपा/पापु/3619/2017-18 दि.21/02/2018 अन्वयेचे प्रमाणपत्र.

10) महानगरपालिकेचे अग्निशमन विभागाकडील पत्र क्र. जा.क्र. मनपा/अग्नि/1129/2018-19 दि.03/01/2019 रोजीचा भोगवटा दाखलाकरीता नाहरकत दाखला.

11) महानगरपालिकेचे उद्यान व वृक्षप्राधिकरण यांचेकडील पत्र क्र. मनपा/वृ.प्रा./मिरारोड/529/2017-18 दि.31/10/2017 अन्वये नाहरकत दाखला.

12) विकासकाचे दि.12/01/2019 रोजीचे शपथपत्र.

# मिरा भाईंदर महानगरपालिका

नगररचना विभाग

स्वामी विवेकानंद भवन, आर.बी.के. स्कूलच्या बाजूला, कनाकिया, मिरारोड (पु.)

जा.क्र. मनपा/नर/ ७४०० | २०१८-१९ दिनांक:- २०/३/२०१९

Bhd. (Legal) 190

महोदय,

विषयांकित जागेमधील रहिवास वापराच्या (सल्लागार अभियंता प्रस्तावित इमारत "स्वागत हाईट्स") इमारत प्रकार टाईप पी-2, विंग "ॲ" (स्टिल्ट + 14) व विंग "बी" (स्टिल्ट + 10), क्षेत्र 6789.97 चौ.मी. चे बांधकाम मंजूर नकाशाप्रमाणे सल्लागार अभियंता मे. डी.एन. पटेल ॲण्ड असो. (नोंदणी क्र. नपानर/68/438/99-2000, दि.16/04/99 व दि.31/12/2018 पर्यंतची मुदतवाढ) यांच्या देखरेखीखाली पुर्ण झालेले असून सदरचे बांधकाम तांत्रिकदृष्ट्या योग्य असल्याबाबत संरचना अभियंता मे. अनिष ॲण्ड असो. व सदर इमारतीच्या प्लंबींगचे काम योग्य झालेबाबत परवानाधारक मे. विनय सॅनिटेशन यांनी दाखले दिलेले आहेत. यास्तव सदर वरीलप्रमाणे च्या इमारतीसाठी खालील अटीशर्तीच्या अधिन राहुन इमारतीसाठी मंजूर नकाशाप्रमाणे भोगवटा दाखला देण्यात येत आहे.

<u>अटीशर्ती</u> -

1) संदर्भिय पत्र क्र. 4 अन्वयेच्या बांधकाम परवानगी / सुधारीत बांधकाम परवानगी मधील अटीशर्तीचे व विकासकाच्या संदर्भ क्र. 12 अन्वयेच्या शपथपत्राचे पालन करणे बंधनकारक राहिल.

2) जर

   अ) मा. आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना आवश्यकता वाटल्यास कोणत्याही प्रकारची पुर्तता करणेस कळविल्यानंतर किंवा कोणताही प्रकारचा प्रतिबंध केल्यानंतर त्याचे पालन नाही केल्यास.

   ब) आपण कोणत्याही प्रकारची माहिती लपवून किंवा चुकीची माहिती सादर करुन परवानगी / भोगवटा दाखला प्राप्त करुन घेतल्याचे मा. आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांची खात्री झालेनंतर सदरचा दाखला रद्द करणेचे अधिकार मा. आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना आहेत

3) सदर इमारतीच्या बांधकामामध्ये भविष्यात कोणत्याही प्रकारचे फेरबदल करावयाचे झाल्यास त्याबाबत महानगरपालिकेची परवानगी प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे.

4) सदरच्या दाखल्यामध्ये नमुद केलेल्या वापरा व्यतिरिक्त भविष्यात बदल केल्याचे निदर्शनास आल्यास सदरचा दाखला रद्द समजणेत येवून पुढील कार्यवाही करणेत येईल.

5) सदरच्या दाखल्यामुळे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 मधील कोणत्याही तरतुदी अन्वयेच्या कार्यवाहीसाठी बाधा येणार नाही.

6) सदर इमारतीलगतचा विकास योजना रस्ता सार्वजनिक वापरासाठी निरंतरपणे खुला ठेवणे विकासकावर बंधनकारक राहिल तसेच सदर जागेत भविष्यात काही वाद झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी विकासकाची राहिल.

7) सदरच्या दाखल्यामुळे अर्जदारास त्यांच्या मालकीच्या नसलेल्या कोणत्याही जमिनीचा कोणत्याही प्रकारे वापर करता येणार नाही.

8) सदर जागेच्या मालकीबाबतच्या मा. न्यायालयात सुरु असलेल्या दाव्याबाबत मा. न्यायालयाच्या आदेशाचे पालन करणे विकासकावर बंधनकारक राहील. त्याबाबत महानगरपालिकेची कोणत्याही प्रकारची जबाबदारी राहणार नाही.

9) विकासकाच्या दि.12/01/2019 रोजीच्या शपथपत्राप्रमाणे विकास योजना रस्त्याने बाधीत क्षेत्राची नोंद महानगरपालिकेचे नावे झालेबाबतचा 7/12 उतारा व फेरफार तीन महिन्यांच्या आंत सादर करणे बंधनकारक राहिल.

10) अर्जदारांनी सादर केलेल्या दि.12/01/2019 रोजीच्या शपथपत्राप्रमाणे मलनिस्सारण व्यवस्था, सांडपाणी व्यवस्था, पाणीपुरवठा व्यवस्थाबाबत देखभाल दुरुस्ती करणे बंधनकारक राहिल.

11) सदर इमारतीचा वापर सुरु करणेपुर्वी सदर दाखला वेळी सादर केलेल्या सर्व विभागाकडील नाहरकत दाखला / प्रमाणपत्र / परवानगी यामधील अटीशर्तीची पुर्तता करणे बंधनकारक राहिल.

12) रेखांकनामधील वाहनतळाची जागा व आर.जी. ची जागा कायमस्वरुपी सार्वजनिक वापरासाठी खुली ठेवणे बंधनकारक राहिल.

मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय भाईंदर.

(बालाजी खतगांवकर) 01/3/19

आयुक्त

मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत - 1) कर संकलक व निर्धारक

2) विभाग प्रमुख, अतिक्रमण तथा अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभाग